**नियमित दिवाणी दावा क्र.८/२०१९**

**फिरोज विरुध्द प्रतिक्षा**

**CNR:MHSN14-000014-2019**

## नि.क्र. ३५ वरील आदेश

१. वादींनी प्रतिवादींच्या विरुध्द निरंतर मनाईकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. दाव्याची चौकशी चालू असताना वादी नं. ५ हे दि. ०५/०३/२०२३ रोजी मयत झाले आहेत. वादींनी नि.क्र. ३४ सोबत त्यांचे मृत्यू दाखल्याची छायांकीत प्रत दाखल केलेली आहे. वादी नं. ५ यांना अर्जात नमूद केलेप्रमाणे नं. १ ते ३ हे सरळ व कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. त्यामुळे वादींनी सदरचे वारस रेर्कार्डवर घेणेची विनंती केलेली आहे. सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे म्हणणे दिले असून त्यांनी अर्ज व त्यातील मजकूर खोटा व लबाडीचा असून तो सदर काम लांबणीवर टाकणेकरिता दिला असल्याने नामंजूर करणेची विनंती केली आहे. अर्ज मंजूर करणेचे झालेस वादींना कॉस्ट करणेची विनंती केलेली आहे.

२. वादींचा अर्ज, त्यावर प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे व दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई मिळणेकरिता आहे. मयतांचे वारसांचा देखील दावा मिळकतीमध्ये हक्क आहे. त्यामुळे दावा गुणदोषांवर चालण्याकरिता अर्जात नमूद वादी नं. ५ चे वारस नं. १ ते ३ यांना अभिलेखावर घेणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. ३५ मंजूर करण्यात येतो.

VINAYA ATMARAM DESAI

Digitally signed by VINAYA ATMARAM DESAI
Date: 2023.08.01 11:36:37 +0530

शिराळा **(श्रीमती व्ही.ए.देसाई)**

दिनांक ३१/०७/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, शिराळा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 31/07/2023 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 31/07/2023 |
| Judgment uploaded on | : | 01/08/2023 |